दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ११६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.२० जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# मूसळधार पावसाने झोडपले ; अनेक ठिकाणी पुरसदृश्य परिस्थिती

## वर्षा सहलीसाठी गेलेल्या ११६ जणांचा जीव खारघर पोलिस व अग्निशमन दलाच्या सतर्कतेने बचावला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**गेल्या दोन दिवसांपासून पनवेल परिसराला मुसळधार पावसाने झोडपले पनवेल तालुक्यासह पनवेल शहरातील सखल भागात पाणी साचले होते. तालुक्यातील अनेक बैठ्या घरात पाणी शिरुन अनेकांचे नुकसान झाले. तर दुचाकी आणि चारचाकी वाहने बंद पडली होती. जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत होते. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यातच वर्षा सहलीसाठी आड मार्गाने व पोलिसांच्या नजरा चुकवून गेलेल्या ११६ जणांचा जीव खारघर पोलिस व अग्निशमन दलाच्या सतर्कतेमुळे बचावला आहे.**




पनवेल शहरातील गाढी नदी दुथडी भरुन वाहत आहे. तसेच पनवेल-सायन महामार्गावरील कळंबोली सर्कल व खारघर येथील महामार्गाला जलाशयाचे स्वरुप प्राप्त झाले होते. त्यामुळे गाडी चालवताना वाहनचालकांना कसरत करावी लागत होती. तालुक्यातील डुंगी, आदई, नवीन पनवेल, ओएनजीसी फाटा, पळस्पे फाटा, कळंबोली या परिसरात गुडघ्यापर्यंत पाणी साचले होते. गाढी नदी दुथडी भरुन वाहत असल्याने नदी किनारी परिसरातील अनेक गावातील घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरले होते. यामुळे ग्रामस्थांचे आर्थिक नुकसान झाले आहे. डुंगी गावातील अनेक घरे पाण्याखाली होती.

पूरसदृश्य परिस्थितीत अडकलेल्या ग्रामस्थांना मदत करण्याकरिता तहसीलदार, पनवेल शहर पो-लीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्यासह प्रांत, तलाठी, सर्कल यांचे विविध पथके तयार करण्यात आली आहेत. सदरची पथके प्रत्यक्ष जागेवर जाऊन मदत कार्य करीत आहेत अतिवृष्टी झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ नये खाडी किनारी राहणाऱ्यांचे स्थलांतर ही करत होते. वेधशाळेने अतिवृष्टी होण्याचा इशारा दोन दिवस अगदरच दिल्याने खाडी किनाऱ्यावरील गावांना दक्षतेचा इशारा देण्यात आला होता.

पनवेल शहरातील टपाल नाका, भाजी मार्केट, पंचरत्न हॉटेल, पटेल मोहल्ला, कच्छि मोहल्ला, तालुका पोलीस स्टेशन, साईनगर, सोसायटी परिसर, अमरधाम स्मशानभूमी, ओरियन मॉल समोरील परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. तालुक्यातील घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली होती. मुसळधार पाऊस होत असल्याने घरामध्ये साचलेले पाणी बाहेर काढणे कठीण झाले होते. घरातील व दुकानातील सामान भिजल्याने ग्रामस्थांना आर्थिक फटका बसला आहे.

दरम्यान रात्री पनवेल, कातकरी वाडी येथील २० कुटूंबांच्या घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे त्यांचे स्थलांतर तालुका क्रिडा संकुल याठिकाणी करण्यात आले आहे. पनवेल येथील भारतनगर, कच्ची मोहल्ला येथे पाणी वाढू लागल्याने येथील नागरीकांना काल रात्री ११.०० ते ११.३० या वेळी सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, स्वच्छता अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या पथकाने भेटून येथील नागरिकांचे सुरक्षीत ठिकाणी स्थलरांतरण करण्यात आले. येथील जवळपास १०० नागरिकांना पालिकेच्या उर्दू शाळेमध्ये स्थलांतरीत करण्यात आले. अशोक बाग, अंकिता सोसायटी, डायमंड पार्क येथे पावसाचे पाणी साचले होते या ठिकाणी पंपाच्या साहाय्याने पाण्याचा उपसा करण्यात आला. नवीन पनवेल येथील बांठीया हायस्कूल शेजारील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक ३ मध्ये पाणी शिरल्याने हे केंद्र तात्पुरते नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक १ व कर्नाटक हॉल याठिकाणी हालविण्यात करण्यात आले आहे कळंबोली कोविड सेंटर पाणी साचले होते. येथील पाणी पंप लावून पकाढण्यात आले. कळंबोली हायवेवरून कॉलनी मध्ये जाण्याच्या रस्त्यावर झाड पडायला आले होते ते काढण्यात आले.

पालेखुर्द पाटिल वाडी येथे सखल भागात पाणी साठले होते. सहायक आयुक्त वंदना गुळवे यांनी स्वतः या ठिकाणी उपस्थित राहून जेसीबीच्या साहाय्याने तातडीने नाल्याचे काम केल्याने पाण्याचा निचरा होण्यास मदत झाली. खिडुक पाडा, आदिवासी वाडी येथील लोकांच्या घरांमध्ये पाणी जाऊ नये म्हणून किंवा कोणतीही हानी होऊ नये म्हणून या लोकांना कळंबोलीच्या प्रभाग कार्यालय येथे हलविण्यात आले आहे. नवीन पनवेल सेक्टर ७ जवळ पाणी साचले होते, खांदा कॉलनी सिग्नल जवळ साचलेले पाणी जाण्यासाठी मार्ग मोकळा करण्यात आला. तसेच कळंबोली येथील कोविड सेंटरच्या आवारात साचलेले पाणी पंप लावून, पाणी काढण्यात आले. तळोजा गाव मन्नन कॉलोनी या ठिकाणची सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे यांनी पाहणी केली. या ठिकाणच्या बाधित कुटुंबातील महिला व मुले यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले. दरम्यान नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांना पनवेल महापालिकेकडून सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे.




पापडीचा पाडा, इकट पाडा, तळोजा मजकुर, घोट, पडघे, पेंधर, कळंबोली नोड, तक्का या भागाची सकाळपासून आयुक्त गणेश देशमुख यांनी पहाणी केली. येथील समस्या जाणून घेऊन त्याप्रमाणे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अतिवृष्टी दरम्यान येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी उपायुक्त सचिन पवार, कार्यकारी अभियंता संजय कटेकर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





## ११६ पर्यटकांना केले रेक्स्यू

खारघर परिसरातील डोंगरात वर्षा सहलीसाठी रविवारी ११६ पर्यटक त्यात ७८ महिला ५ मुले हे पर्यटनासाठी आले होते. परंतु पावसाचा जोर वाढल्याने मोठ्या प्रमाणात पाणी डोंगराहून खाली वाहू लागले. त्यामुळे संबंधित पर्यटकांना बाहेर येण्यासाठी जागाच राहिली नाही. पाणी वाढल्याने त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. जीव मुठीत धरून या ठिकाणाहून सुटका करण्याच्या अनुषंगाने ते इतरांशी संपर्क करु लागले. या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांसह



अग्निशमन दलाचे जवान त्याठिकाणी पोचले व त्यांनी अडकलेल्या सर्व पर्यटकांना सुखरूप बाहेर काढले.

## महाड तालुक्यात पावसाचे आकांडतांडव : दरडींचा धोका कायम

**दै.रायगड नगरी । महाड**

गेली आठ दिवस तालुक्यात पावसाचा कहर सुरुच आहे. सोमवारी पहाटे पावसून त्याचा वेग वाढल्यामुळे तालुक्यातून वाहणाऱ्या सावित्री गांधारी काळ आणि नागेश्वरी नद्यानी धोक्याची पातळी ओलांडल्यामुळे शहरांतील सखल भागात पुराचे पाणी शिरू लागल्याने व्यापारी नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली आहे. यामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे.

दरम्यान दिर्घकाळ कोसळणाऱ्या पावसामुळे तालुक्यांत दरडी कोसळण्याचा मोठा धोका असतो यामळे दरड रेषेत येणाऱ्या गावे वाड्या येथील ग्रामस्थांना सुरक्षित ठिकाणी तात्काळ .../२



## उरण तालुक्यात अतिवृष्टीमुळे पुरस्थिती

### चिरनेर येथील २०० हुन अधिक घरांना घुसले पाणी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात दोन दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसाने अनेकांची दाणादाण उडविली असून,चिरनेर येथील सुमारे चार किलोमीटर डोंगराच्या भागा-तील पावसाचे पाणी पूर्वेकडून सरसर खाली येत असल्याने काल सकाळ पासून चिरनेर येथे सदृश पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. गावातील कातळपाडा, मधीलपाडा रांजणपाडा मूळपाडा येथील २०० हुन अधिक नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरले आहे.

सकाळपासूनच सदृश पूर परिस्थिती निर्माण झाल्याने चिरनेर येथील घरात शिरलेल्या पाण्यामुळे अन्नधान्यासह जीवनावश्यक वस्तूंच्या अतोनात नुकसान झाले आहे. आपत्कालीन यंत्रणेचा मात्र बोजवारा उडाला असून, एकही अधिकारी चिरनेर पूरपरिस्थिती पाहणीसाठी फिरकला नसल्याने मोठ्या प्रमाणात खेद व्यक्त करण्यात येत आहे.

वाढत्या बांधकामांचा भराव व पाण्याच्या निचऱ्याची गैरसोय यामुळे डोंगरातून येणारे पाणी गावात शिरत आहे.याशिवाय चिरनेर हायस्कूल ते मोठेभोम पर्यंतच्या रस्त्यावरील ठिकठिकाणी पाण्याच्या निचऱ्यासाठी साकारण्यात आलेले पाईप सध्या एख-ाद्या ठिकाणीच दिसत असून ते नव्याने रस्त्याची बांधणी करताना सार्वजनिक बांधकाम खात्याने पाण्याचा निचरा करणारे पाईप न लावल्याने ही पूर परिस्थिती आणि गावातील घरांना पाणी शिरण्याचा घटना घडत आहेत.

याला पूर्णतः सार्वजनिक बांधकाम खाते जबाबदार असल्याचा आरोप येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.बऱ्याच वर्षातून यंदा चिरनेर गावातील पुराच्या पाण्याची पातळी समोरील आठ फूट उंचीच्या रस्त्यापर्यंत पोहोचले .../२

## माथेरान घाटामध्ये दरड कोसळली



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमध्ये काल पासून सुरू असलेल्या जोरदार पावसाने नेरळ माथेरान घाटामध्ये पुन्हा एकदा दरड कोसळली असून काही काळ हा रस्ता वाहतुकीसाठी बंद होता येथील टॉक्सिचालकांनी तातडीने दगडी बाजूला करून एकेरी वाहतूक सुरू केली आहे.

माथेरानमध्ये मागील दोन दिवसंपासून सुरू असलेल्या जोरदार पावसाने येथील जनजीवन विस्कळीत झाले असून आज दुपारी तीनच्या दरम्यान येथील वॉटर पाईप स्टेशन च्या पुढे असलेल्या एका अवघड वळणावर दरड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती काही दिवसंपूर्वीही ह्याच ठिकाणी दरड कोसळून हा भाग धोकादायक झाला होता व आज पुन्हा येथे मोठ्याप्रमाणात पाण्याबरोबर मोठमोठे दगड रस्त्यावर वाहून आल्याने काहीकाळ वाहतूक विस्कळीत झाली होती पण नेरळ माथेरान ह्या घाटामध्ये चालणाऱ्या टॅक्सी चालकांनी तातडीने रस्त्यावर आलेले दगडमाती बाजूला करीत ऐकेरी वाहतूक सुरू केली आहे तरीही हा भाग धोकादायक बनला असून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे घाटातील अनेक ठिकाणे धोकादायक बनलेली आहेत. दोन वर्षांपूर्वी एमएमआरडीए च्या माध्यमातून नेरळ माथेरान घाट रस्त्याचे काम करण्यात आले होते ह्यावेळी फक्त रस्त्याचे काम करण्यात आले व त्यावेळी रस्ता रुंदीकरणाच् वेळी अनेक ठिकाणी दगड फोडण्यात आले आता हीच ठिकाणे धोकादायक बनत चालली आहे. त्यामुळे ह्या अशा धोकादायक ठिकाणांवर सुरक्षा जाळी बसविण्यात यावी अशी मागणी माथेरांकर करीत असताना ही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे माथेरांकडे येण्यासाठी हाच एकमेव मार्ग आहे व विकेंड ला येथे अनेक पर्यटक आले होते. त्यामुळे आज घाटामध्ये वर्दळ आहे पण सुदैवाने कोणतीही हानी झालेली नाही.

## पेण तालुक्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

### काही गावांचा संपर्क तुटला ; दरड कोसळून घरांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पेण**

मागील दोन दिवसापासून सतत होणाऱ्या मुसळधार पावसाने पेण तालुक्याला झोडपून काढले आहे. रविवारी दिवसभर, रात्री व सोमवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे काही गावांचा संपर्क तुटला तर अनेक गावांतील घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरून पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागोठणे एस. टी. स्टँड व नागोठणे कोळीवाडा परिसरात अंबा नदीचे पाणी शिरले आहे. नागोठणे ते पोयनाड रोडवरील कुहिरे गावाजवळ रस्त्यावर पाणी आल्याने वाहतूक बंद करण्यात आलेली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर पेण तालुक्यांतील जिते गावच्या हद्दीत बाळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने बाळगंगा नदी तुडूंब भरून वाहत असल्याने मुंबई-गोवा महामार्ग पाण्याखाली गेला होता. महामार्गाला नदीचे स्वरूप आल्याने गाडी चालवताना वाहनचालकांना कसरत करावी लागत होती.

पेण तालुक्यातील रावे, साई गाव, खरोशी, जिते, तांबडशेत,जोहे कळवे, दादर चूनाभट्टी या गावांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. बाळगंगा नदीने धोक्याची पा-तळी ओलांडल्याने अनेक गावातील घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरले होते. यामुळे ग्रामस्थांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

पेण तालुक्यातील बळवली, दुरशेत खरोशी या गावांचा संपर्क तुटला होता. तसेच तांबडशेत जोहा रस्ता पाण्याखाली गेला आहे. बळवली गावातील २० ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. तसेच दुरशेत येथे दरड कोसळून ४ घरांचे नुकसान झाले आहे. चुनाभट्टी येथील ८२ ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. चुनाभट्टी येथे घरामध्ये पाणी .../२



# निसर्ग की निष्काळजी?

पावसाचे वर्तन बदलत आहे. पावसाळ्यातले कोरडे दिवस वाढत आहेत. मात्र, पाऊस येतो तेव्हा त्याची तीव्रता, वेग आणि प्रमाण जुने विक्रम मोडते. शनिवारचा पाऊस असाच विक्रमी होता आणि त्याने चेंबूर आणि विक्रोळी येथे बळी घेतले. दर वर्षी मुंबईत पावसाळ्यात घरे व इमारती पडतात. अनेक जीव जातात. यात एकतर जुन्या, खिळखिळ्या इमारती असतात किंवा डोंगरांच्या अंगाखांद्यावरच्या झोपड्यांवर दरडी कोसळतात. गेल्याच महिन्यात 'तौक्ते' चक्रीवादळ धडकले तेव्हा मालाड-मालवणी येथे इमारत कोसळून बारा प्राण गेले. आता चेंबूरच्या भारतनगर भागातही घरांवर दरड पडली. विक्रोळीत छत पडले असले तरी इथेही ही घरे डोंगराळ भागातच आहेत. तेथे पंचशीलनगरात घरांवर दरड पडली आहेच. केंद्र व राज्य सरकारने मृतांच्या नातलगांना मदत व जखमींना मोफत उपचार दिले असले तरी महामुंबईच्या एकूण नगररचनेचा, घरबांधणीचा आणि मोकळ्या सार्वजनिक जागांचा मुळातून नव्याने विचार करण्याची गरज आहे, हे राज्यकर्त्यांना वारंवार दुर्घटना घडूनही उमजत नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. दर वर्षी मुंबईत दादर, लालबाग, परळ किंवा इतर भागांत पाणी साठते. मुंबईकरांना त्याची सवय झाली आहे. मात्र, या पावसात वसई, विरार, मीरा-भाईंदर, दहिसर आदी उपनगरे व शहरांमध्ये हाहाकार माजला. इमारतींमध्ये अडकलेल्या किंवा गच्चीवर आश्रय घेतलेल्या नागरिकांना सोडविण्यासाठी आपत्ती निवारण दलांना धाव घ्यावी लागली. हे असे प्रत्येक वर्षी होत असेल तर केवळ निसर्गाला बोल लावून चालणार नाही. सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारच्या हलगर्जीमुळे या आपदांची व्याप्ती आणि तीव्रता दर वर्षी वाढते आहे. नागरिकांना कितीही आग्रह केला तरी ते धोकादायक इमारतींमधून बाहेर पडत नाहीत, असे मुंबईच्या महापौर म्हणतात. ही तक्रार खरी आहे. मात्र, याचे मुख्य कारण आपले नीट पुनर्वसन होईल आणि आपण 'ट्रान्झिट कॅम्प'मध्ये वर्षानुवर्षे सडणार नाही, याची शाश्वती या रहिवाशांना नसते. यामुळे प्राणभय असले तरी रहिवासी डगमगती घरे सोडत नाहीत. मुंबईत कसा तरी आसरा मिळावा, यासाठी बेकायदा इमारतींमध्ये घरे घेण्याचे प्रमाणही त्यामुळेच जास्त आहे. अनेक दुर्घटनांमध्ये नेमके हेच रहिवासी सापडतात. करोनाकाळात मार्च २० ते फेब्रुवारी २१ या एका वर्षात मुंबईत बेकायदा बांधकामे झाल्याच्या १३ हजार तक्रारी आल्या. यातल्या जेमतेम पाचशे कामांवर कारवाई झाली असावी. हेच मुंबई महानगर क्षेत्रात होत असणार. या आकड्यांवरून मुंबई दिवसेंदिवस किती अपघात व दुघर्टनाप्रवण बनते आहे, हे लक्षात येईल. सध्या महामुंबईतील रस्तेवाहतूक व लोकलसेवा करोनामुळे मर्यादित आहे. तरीही, त्यांचा या अतिवृष्टीने खोळंबा झाला. रस्ते व रेल्वेमार्ग पाण्याने भरून गेले. महामुंबई किंवा पुण्यातही आता 'एक महापालिका' इतकेच एकक मानून नियोजन व विकास करता येणार नाही, हे अजूनही आपल्याला कळत नाही. इमारती कोसळणे ही नैसर्गिक आपत्ती मानता येणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने अलीकडेच स्पष्टपणे म्हटले होते. तसेच, जागोजागी पाणी साठणे, वाहतूक कोलमडणे, गटारांमधून माणसे वाहून जाणे किंवा जनजीवन वारंवार विस्कळित होणे या साऱ्यांबद्दल फक्त निसर्गाला दोष देऊन चालणार नाही. असे पूर आले, की पाश्चात्य देशांतील किंवा अमेरिकेतील अशी उदाहरणे नागरिकांच्या तोंडावर फेकण्याची खोड राज्यकर्त्यांना लागली आहे. मात्र, तिथे कधीही इतकी प्राणहानी होत नाही. शिवाय, एकदा असे संकट आले की सरकार, समाज शहाणे होतात. आपल्याकडे कांदळवने किंवा मिठागरांच्या जागा मोकळ्या राहू देत, असा कुणी कितीही आक्रोश केला तरी नोकरशाही व राज्यकर्ते त्याकडे ढुंकून बघत नाहीत. महामुंबईतल्या एकाही नदीचे पात्र व प्रवाह अतिक्रमण किंवा कचरामुक्त नाही. मुंबईतली मैदाने, मोकळ्या जागा, जुन्या छोट्या इमारती क्रमाक्रमाने बिल्डरांच्या घशात जात आहेत. या साऱ्यातून निसर्गाचा तर सोडाच; नगररचनेचा किमान तोल बिघडून गेला आहे. जे मुंबईत, तेच वसई, विरार, पालघर, कल्याण, डोंबिवली, ठाणे या साऱ्या शहरांमध्ये! शनिवारी रात्री जे बळी गेले; त्यांचा एका अर्थाने साऱ्या व्यवस्थेने मिळून केलेला 'सदोष मनुष्यवध'च आहे. अडचणीच्या, धोक्याच्या किंवा डोंगराळ जागेत कुणी हौस म्हणून राहत नाही. त्यांच्यावर ती वेळ येते. अशी अनधिकृत घरे, वस्त्या उभारणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळ्या महामुंबईत अनेक दशके निर्वेधपणे कार्यरत आहेत. त्यांना सर्व संरक्षण सदैव मिळते. चेंबूर आणि विक्रोळीसारख्या दुर्घटना घडल्या, की शोकसंदेश पाठवायचे आणि भरपाई जाहीर करावयाची, इतकेच सत्ताधाऱ्यांना समजते. त्यांना महामुंबईच्या मूळ समस्यांचे लोकहित साधणारे खरेखुरे उत्तर नकोच आहे. त्यामुळे, एका आपत्तीमधून बाहेर पडताना पुढच्या आपत्तीच्या भयाने प्राण मुठीत धरून जगणे, हेच अडीच कोटी महामुंबईकरांच्या नशिबी आले आहे.

# म्हसळ्यात पावसाची संततधार सुरु ; मेंदडी येथे दुर्घटना ४२ वर्षीय मच्छिमार गेला वाहून



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात काल पावसाची संततधार सुरु होती, दिवसभरात १५९ मि.मि पावसाची नोंद झाली. तालुक्यात आजपर्यंत २२६७ मि.मि. पावसाची नोंद झाली. काल सकाळी १०.३०च्या सुमारास सुरेश हरेश पायकोळी वय ४२ व शशीकांत लक्षण पाटील वय ४९ हे दोघेही खाडी लगत नांगरून (बांधून) ठेवलेली छोटी बोट खाडीत वाहून जात असल्याचे लक्षात आल्याने ती वाचवाला जात असताना गावखार भागात पाण्याच्या घावात अडकले.

शशिकांत प्रयत्नांची शर्थ करून किनाऱ्या लगत आला तर सुरेश लागूनच आसलेल्या राजपुरी खाडीत वाहून गेला आसावा असा अंदाज आहे.

मेंदडी येथील स्थानिक कोळी बांधवानी जवळपासच्या ठिकाणी शोधकार्य सुरू केले.पावसाचा जोरदार मारा व काळोखी मुळे शोधकार्य काल रात्री उशीरा थांबले, आज सकाळ पासूम महाड येथील साळुंखे रिस्क्यू ऑपरेशन टीमचे माध्यमातून शोध कार्य अद्यापही सुरु आहे. तहसीलदार शरद गोसावी,नायब तहसीलदार के.टी.भिंगारे, सपोनी उध्वव सुर्वे, मंडळ अधिकारी सलीम शहा, दत्ता कर्चे, ग्रामसेवक मच्छींद्र पाटील, तलाठी गीऱ्हे, पो.ना.संतोष चव्हाण, ही मंडळी स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी शोध कार्याला मदत करीत आहेत.

तुफानी पाऊस व वाऱ्यामुळे संदेरी येथील २ घरांच्या भिंती आणि अंगणवाडीचे शौचा लय कोसळले, यामध्ये केरू धाकू नगरकर यांच्या घराचे पडवीची भिंत अंदाजे ४ते ५ हजार, रमेश पाष्टे यांच्या घराची भिंत पडून सुमारे रु.२२ हजाराचे नुकसान झाले.

अंगणवाडीचे शौचालय कोसळून यात सुमारे रु.२५ हजाराचे नुकसान झाल्याचे स्थानिकानी सांगितले तसेच गणेशनगर (रेवली) येथील महादेव धर्मा कांबळे यांच्या वाड्याची भिंत कोसळली त्यांचेही २५ हजाराचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

# आंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडल्याने नागोठण्यात पूर

## एस.टी.स्थानकात, बाजार पेठ, कोळीवाडा व मोहल्ल्यासह इतर परिसर जलमय

**दै.रायगड नगरी । वाकण**

गेल्या तीन-चार दिवसांपासून पडणाऱ्या मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्यासह नागोठणे विभागालाही झोडपून काढले आहे. त्यामुळे गेले दोन दिवस दुथडी भरून वाहणा-या अंबा नदीने रविवारी (दि.१८) सायंकाळी धोक्याची पातळी ओलांडली. त्यानंतर सोमवारी (दि.१९) पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास नागोठणे एस.टी.स्थानक, रिक्षा स्थानक, आठवडा बाजार, छ. शिवाजी महाराज चौक, मिनिडोर स्टँड, रिक्षा स्टँडच्या समोरील श्री. मरिआई मंदिर परिसर, नागोठणे कोळीवाडा, नागोठणे मोहल्ला तसेच इतर काही परिसरात पूराचे पाणी शिरले व नागोठणेकरांना यावर्षीच्या या पहिल्यावहिल्या पुराला सामोरे जावे लागले.



गेल्या सात आठ दिवसांपासून संपूर्ण रायगड जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यातच नागोठणे विभागासह पाली, खोपोली या ठिकाणी पडणा-या मुसळधार पावसामुळे येथील अंबा नदी गेले दोन दिवस दुथडी भरून वाहत होती. पावसाचा जोर कायम राहिल्याने अंबा नदीच्या पात्रात वाढ होत गेल्याने आज सकाळी नागोठण्यात हा पूर आला. या पुरामुळे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील छोटे व्यावसायिक व दुकानदारांची आपापले सामान सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी एकच धांदल उडाली. या भागातील नागरिकांना व दुकानदारांना या पूराच्या पाण्यामुळे खुप त्रास सोसावा लागला. विशाल मेडिकल समोर असणार्या मिनिडोर रिक्षा स्टँडच्या परिसरात तसेच नागोठणे एस.टी.बस स्थानकासामोरील परिसरात पूराचे पाणी आल्याने याचा वाहतूकीवर परिणाम झाल्याचे पहावयास मिळाले.

याशिवाय कोरानाच्या पार्श्वभूमीवर नागोठण्यात दर शनिवार-रविवारी करण्यात येत असलेल्या विकेंड लॉकडाऊन नंतर सोमवारी सकाळी परिसरातील जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना व दुकानदारांनाही याचा फटका बसला. तसेच यावेळी नागोठणे येथून कामानिमित्त ये जा करणारे चाकरमान्यांची तारांबळ उडाली. या आलेल्या पुरामुळे एस.टी. स्थानकात येणाऱ्या गाड्यांना काही काळ नागोठणे येथील मुंबई गोवा महामार्गावर थांबावे लागले होते. तसेच पूर आलेल्या परिसरातील सर्वांनाच या पूराच्या परिस्थितीचा सामना करावा लागला.

या पार्श्वभूमीवर नागोठणे येथील मुख्य बाजार पेठ, कोळीवाडा परिसरातील दुकानदार व नागरिक सतर्क राहिले होते. या पूराच्या पाण्यामुळे आंबा नदीवरील पुल पाण्याखाली गेल्याने नागोठणे कडून वरवठणे गावाकडे जाणारा रस्ताही यावेळी या पूराच्या पाण्यामुळे पूर्णपणे बंद झाला होता. आंबा नदीला आलेल्या या पुरामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतूक पुर्णपणे बंद होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून यावेळी नागोठणे पोलीस ठाणे, ग्रामपंचायत प्रशासन व महसूल खाते यांच्याकडून पूर परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत होते.

# पनवेल महानगरपालिकेने लादलेल्या जिझिया मालमत्ता कराविरोधात उपोषण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेने लादलेल्या जिझिया मालमत्ता कराविरोधात तसेच कळंबोली शहर आणि कळंबोली गावात न झालेल्या विकास कामांसंदर्भात आज पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक रविंद्र अनंत भगत बेमुदत उपोषणावर बसले आहे.

आमदार बाळाराम पाटील व मा.आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या समवेत उपोषण स्थळी जाऊन नगरसेवक रविंद्र भगत यांची भेट घेऊन पाठींबा दिला. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, काँग्रेस नेते सुदाम पाटील, समाजवादी पक्षाचे अनिल नाईक, नगरसेवक शंकर म्हात्रे, गोपाळ भगत, सतीश पाटील, विजय खानावकर, शिवसेना नेते कृष्णा कदम, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, सौ.प्रज्योती म्हात्रे, सौ.सारिका भगत, सौ.प्रिया भोईर, युवा नेते प्रकाश म्हात्रे, जॉनी जॉर्ज, किरण दाभने, विजय भोईर, विजय पाटील, सुभाष पाटील, महिला आघाडीच्या सौ.सरस्वती काथारा, सौ.स्वाती रौधंळ तसेच सर्व आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला आघाडीच्या कार्यकर्त्या उपस्थित होते. पनवेल महानगरपालिका सिडको क्षेत्रात कुठल्याही प्रकारचे विकासकाम न-करता नागरिकांवर जिझिया मालमत्ता कर सत्ताधाऱ्यांच्या मदतीने लादलेले आहे. या विरोधात शेतकरी कामगार पक्ष व महाविकास आघाडीच्या माध्यमातून रहिवासीयांच्या बाजूने वारंवार आंदोलन करीत आहेत. असे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## महाड तालुक्यात पावसाच आकांडतांडव : दरडींचा धोका कायम

स्थलानंतर करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहे. पावसाचा आणखी जोर वाढल्यास अतिवृष्टी महापुर दरडी कोसळण्याच्या घटनाची पुनरावृती नाकारता येत नसल्याने शासनाची सर्वती आपद्कालीन यंत्रणा सज्य ठेवण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालया तर्फे महाड महसूल विभाग, नगर पालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पंचायत समिती महामार्गाचे काम करणारे ठेकेदार, आरोग्य व्यवस्थापन, रुग्णवाहिका, फायर फायटर, जलतरणपट्टू, स्पिडबोटी आदी तैनात ठेवण्याच्या नदी पात्राची माहिती संभाव्य धोक्याचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्य ठेवण्यात आल्या आहेत. प्रतिवर्षी महाड शहरात तालुक्यातून वाहणाऱ्या सावित्री गांधारी काळ आणि नागेश्वरी नद्यानी धोक्याची पातळी ओलांडताच शहरातील मुख्य बाजार पेठेसह संपूर्ण शहराला पुराच्या पाण्याचा वेढा पडतो परिणामी जिवीत आणि वित हाणीही होतच असते त्याबरोबर सन १९९४ पासून तालुक्याच्या बहुतांश भागांत एकावर एक दरडी कोसळून फार मोठ्या प्रमाणावर जिवीत हानी होत आलेली आहे. सोमवारी सकाळी शहरातील दस्तूरी नाका ते रायगड रोड पाण्याखाली गेल्याने वहातूक मार्ग बदलावा लागला तर गांधारी नाका पुलावरून रावढळ बिरवाडी नाते आदी भागांत पुराचे पाणी शिरल्याने दळण वळण विस्कळीत झाले होते.

## उरण तालुक्यात अतिवृष्टीमुळे पुरस्थिती

असून,एका रस्त्यावरून पाणी लागले होते. मागील वर्षी डोंगराच्या पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्थेसाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून नाल्याचे बांधकाम करण्यात आले. मात्र पूर परिस्थितीतुन चिरनेर वासीयांची सुटका अद्यापही झालेलीच नाही.

ही पूर परिस्थिती टाळण्यासाठी चिरनेर हायस्कूल ते मोठेभोम रस्त्यापर्यंत जुने पाईप असलेल्या ठिकाणी किमान चार फुट व्यासाचे सिमेंटचे एका मोरीस प्रत्येक दोन पाईप या प्रमाणे सार्वजनिक बांधकाम टाकल्यास पाण्याचा निचरा सुरळीतपणे होईल. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने त्वरित पावले उचलून चिरनेर येथील पूरपरिस्थिती टाळण्यासाठी हायवे रोडवरील मोऱ्यांचे पाईप नव्याने साकारून चिरनेर वासीयांची पुरापासून सुटका करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## पेण तालुक्यात मुसळधार पावसामुळे पुरसदृश्य परिस्थिती : जनजीवन विस्कळीत

शिरल्याने अडकलेल्या ४ ग्रामस्थांना वाचविण्यात यश आले आहे. पूरसदृश्य परिस्थितीत अडकलेल्या ग्रामस्थांना मदत करण्याकरिता पेण तहसील कार्यालयाकडून तलाठी, सर्कल, कोतवाल व स्थानिक सरपंच यांचे विविध पथके तयार करण्यात आली आहेत. सदरची पथके प्रत्यक्ष जागेवर जाऊन मदत कार्य करीत आहेत अतिवृष्टी झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ नये म्हणून इंडियन कोस्ट गार्ड चे पथक मुरुड येथून पेण येथे पाचारण करण्यात आले आहे.

वेधशाळेने अतिवृष्टी होण्याचा इशारा दोन दिवस अगदरच दिल्याने खाडी किनाऱ्यावरील गावांना दक्षतेचा इशारा देण्यात आला होता. सोमवारी दुपारपर्यंत कोणत्याही प्रकारची जीवीत हानी किंवा पशुधन हानी झाली नव्हती अशी माहिती पेणच्या तहसीलदार डॉ. अरुणा जाधव व नायब तहसीलदार कांबळे यांनी दिली.

पेण शहरातील एसटी स्टँड, कौंडाळ तळे, कोर्ट परिसर, उत्कर्ष नगर आदी सखल भागांमध्ये पाणी साचले होते.तालुक्यातील हमरापूर विभागांमध्ये अतिवृष्टीचे पाणी गणपती कारखान्यांमध्ये शिरल्यामुळे येथील अनेक गणेश कारखानदारांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे गणेश कारखानदारांना लाखो रुपयांचा फटका बसला आहे. मुसळधार झालेल्या पावसामुळे बळवली, दुरशेत, जिते, चुनाभट्टी, तांबडशेत, हमरापूर येथील ग्रामस्थांच्या घरांमध्ये पहाटे तीन वाजताच पाणी शिरल्याने नागरिकांना मध्ये घबराट निर्माण झाली होती. मुसळधार पाऊस होत असल्याने घरामध्ये साचलेले पाणी बाहेर काढणे कठीण झाले होते. घरातील व दुकानातील सामान भिजल्याने ग्रामस्थांना आर्थिक फटका बसला आहे.

पेण तालुक्यातून नवी मुंबई येथे पाणीपुरवठा करणारे हेटवणे धरण त्याच्या एकूण क्षमतेच्या केवळ ६० टक्के भरले आहे. धरणाची एकूण क्षमता १४७ दशलक्ष घनमीटर एवढी आहे. त्यामुळे धरणातील पाण्याचा विसर्ग करण्यात आला नाही. हेटवणे धरणातून पाणी सोडल्याच्या अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये असे आवाहन हेटवणे धरणाचे मुख्य अभियंता एस. बी.जाधव यांनी केले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून ठाकूर कुटुंबियांचे सांत्वन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



अलिबागचे माजी आमदार मधुकर ठाकूर यांचे निधन झाल्याने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ठाकूर कुटुंबियांचे सांत्वन केले.

माजी आमदार मधुकर ठाकूर यांचा १५ जुलैला ७४ वा वाढदिवस होता, मात्र जन्मदिनीच त्यांनी जगाचा निरोप घेतला. प्रेमळ आणि खऱ्या स्वभावामुळे ते असंख्य सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या मनात घर करून राहिलेले एक सर्वस्पर्शी नेतृत्व होते. त्यांचे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. मधुशेठ यांच्या निधनाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शोक व्यक्त केला होता. रविवारी(दि. १८) लोकनेते रामशेठ ठाकूर, पेणचे आमदार रविशेठ पाटील, भाजपचे जेष्ठनेते वाय. टी. देशमुख, कामगारनेते महेंद्र घरत यांनी अलिबाग तालुक्यातील सातिर्जे गावी ठाकूर कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

# खावटी अनुदान योजना आदिवासींसाठी लाभदायक : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

करोना महामारीमुळे अनेकांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिलेले आहे. या परिस्थितीत डोंगर दऱ्याखोऱ्यात राहणारा आदिवासी समाज रोजगारांपासून वंचित राहिला आहे. त्यामुळे शासनाकडून या आदिवासी बांधवांसाठी खावटी अनुदान वाटप योजना विशेष योजना म्हणून मंजूर केली असून ही योजना आदिवासींसाठी लाभदायक असल्याचे, प्रतिपादन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी केले. काल दि. दि.१८ जुलै रोजी रोहा तालुक्यातील कोलाड येथील ग.द.तटकरे हायसकूल सभागृह येथे झालेल्या खावटी वाटप कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या.



कोलाड येथे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना खावटी अन्नधान्य कीट वाटप देवून कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य दयाराम पवार, पंचायत समिती रोहा उपसभापती रामचंद्र सकपाळ, कोलाडच्या सरपंच श्रीमती.बागवेकर, उपसरपंच श्री.उत्तम बाईत, आंबेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री.सुरेश महाबळे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव, सहायक प्रकल्प अधिकारी श्री.खेडकर, तहसिलदार कविता जाधव, गटविकास अधिकारी आदि उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यातील ४८ हजारहून अधिक लाभार्थ्यांना आदिवासी विभागांतर्गत खावटी अनुदान योजनेतून अन्नधान्य, किराणा साहित्य वाटप करण्यास सुरुवात झाली असून रोहा तालुक्यातील लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरुपात खावटी योजनेचा प्रांरभ करण्यात आला आहे. गेली काही वर्षे बंद असलेली खावटी योजना लोकप्रतिनिधींच्या पाठपुराव्यामुळे पुन्हा सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे खावटी योजना आदिवासी समाजाच्या हक्काची असून करोना काळात पुन्हा सुरु करण्यात आल्याने पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी समाधान व्यक्त केले. आदिवासी स्थलांतरित कुटुंबांनाही या योजनेचा लाभ देण्यात अशा सूचना त्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. या कार्यक्रमासाठी विविध शासकीय विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शेतीच्या कामात बच्चे कंपनीचा हातभार; शाळा बंद असल्याने शेतीत रमतोय

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद आहेत. ऑनलाइन वर्ग सुरू असले तरी गाव ठिकाणी नेटवर्क आणि अँड्रॉइड मोबाईलची वानवा आहे. अशा वेळी बच्चे कंपनी शेतीत रमतांना दिसत आहे. यातून त्यांना अभ्यासाबरोबर एक वेगळा अनुभव देखील मिळत आहे.

पावसाळा सुरु झाला की शाळा देखील सुरू होतात. आणि त्याच वेळी शेतीच्या कामांची देखील लगबग सुरू होते. अशावेळी शाळकरी मुलांना शेतीच्या कामांचा अनुभव फक्त पुस्तकातूनच मिळतो. मात्र यंदा शाळा बंद असल्याने या असंख्य मुलांना प्रत्यक्ष आपल्या शेतात काम करून शेतीच्या कामांचा अनुभव घेता येत आहे. शिवाय यातून त्यांचे शेतीविषयक ज्ञान देखील वाढत आहे. शिक्षक कुणाल पवार यांनी सांगितले की, अभ्यासक्रमातील एक उपक्रम म्हणून क्षेत्रभेट या उपक्रमाअंतर्गत शेतीभेट देऊन विद्यार्थ्यांना नांगरणी भात लावणी असे विविध अनुभव देत होतो. पण या एका दिवसाच्या क्षेत्रभेटीत मुलांना पुरेशी माहिती मिळत नव्हती. मात्र आता शाळा नसल्याने मुले आपल्या किंवा इतरांच्या शेतात जाऊन शेतीच्या कामांचा प्रत्यक्ष कृतीद्वारे अनुभव घेत आहेत. यामुळे त्यांचे ज्ञान अधिक सखोल होत आहे. शिवाय शरीराला व्यायाम मिळून मज्जा आणि गंम्मत देखील होत आहे. तर तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी निलेश शिर्के यांनी सांगितले की माझी दोन मुले अभ्यासाला पुरेसा वेळ देऊन शेतीच्या सर्व कामांत मदत करतात. कोरोना संकटात आलेल्या या संधीमुळे मला मुलांना शेतीचे अधिक कृतीयुक्त ज्ञान व माहिती देता येते. शिवाय शेतकऱ्यांचे कष्ट व मेहनत आदी मूल्य देखील जोपासली जात आहेत. शिवाय त्यांना आंनद देखील मिळतो.

## प्रगतशिल शेतकऱ्यांवर कौतुकाची थाप म्हणजे शेती व्यवसायाला चालना : अर्चना सुळ

**दै.रायगड नगरी । खोपोली**

तरुण वर्गांनी शेतीकडे वळून शेतीमध्ये आमूलाग्र बदल घडवित आहे.शिक्षणांच्या ज्ञानांच्या माध्यमातून शेतीमधून आपण कोणती पिके घेवू  घेवू शकतो.यांची जाणीव निर्माण होवून तरुण वर्गांनी शेतीमध्ये स्वताला झोकून दिले आहे.यामुळे दर वर्षी होत असलेल्या प्रगतशिल शेतक–यांचा शेताच्या बांधावर सन्मान सोहळा निर्माण होत असून शेतकऱ्यांचा सन्मान म्हणजे प्रगतीशील शेतकऱ्यांवर कौतुकांची थाप असून शेती व्यवसायासाठी चालना निर्माण होत आहे.असे प्रतिसादन तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांनी शेताच्या बांधावर शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा खालापूर तालुक्यातील कोपरी आणी वडवळ घेण्यात आले यावेळी त्या बोलतांना व्यक्त केले.

रायगड प्रेस क्लब सलग्न खालापूर प्रेस क्लब च्या माध्यमातून दर वर्षी शेताच्या बांधावर सन्मान सोहळा हा कार्यक्रम घेत असतांना या वर्षी कोपरी येथिल योगेश वसंत फाटे  यांना देण्यात आले.

शेती व्यवसाय करीत असतांना जोड धंदा म्हणून पशुपालन, त्याच बरोबर शेतीमधून विविध पिके घेत आ–हेत. त्याच बरोबर कोयना पुनर वसाहत, वडवळ– कुसावडे येथिल आनंदी देवेंद्र सावंत, गेली तीस वर्षापासून शेती करीत आहे,स्वताच्या नावावर शेती नसून पती अपंग असतांना न डगमगता शेतीशी निगडीत राहून आपल्या मुलींना शिक्षण दिले आणी  आणी आज त्या स्वताच्या पायावर भक्कम पणे उभ्या आहेत.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## जोरदार पावसात माथेरानचे पर्यटन बहरले

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सर्वत्र जोरदार पावसाने हाहाकार माजवला असताना माथेरानमध्ये मात्र पावसमुळेच येथील पर्यटन बहरले असून पर्यटकांच्या आगमनाने येथील व्यावसायिक मात्र खुशीत दिसत आहेत.

कोरोनामुळे माथेरांमधील पर्यटन बंद होते पण मा जिल्हाधिकारी यांनी एक विशेष बाब म्हणून माथेरानचे पर्यटन सुरू केल्या नंतर येथे दिवसेंदिवस पर्यटकांचा ओघ वाटतच असून पर्यटन सुरू झाल्यापासून माथेरानमध्ये पन्नास हजार पेक्षा जास्त पर्यटकांनी पावसामध्ये भिजण्याचा आनंद लुटला असून अनेक हॉटेलची पुढील काही दिवसांनी आगाऊ बुकिंग झाली आल्याने हा महिना तेजीत जाणार असल्याचे चित्र दिसत आहे.

माथेरान मिनिट्रेनच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाली असल्याने पर्यटकांना मिनिट्रेन ची सफर ही घडत असून विकेंड ला दहा फेऱ्या सुरू असतानाही मिनिट्रेन ची तिकीट मिळविण्यासाठी पर्यटकांना मोठमोठ्या रांगा लावाव्या लागत आहेत पण पर्यटक आनंदाने तेही करत असल्याचे येथील स्थानकात दिसून येत आहे.

माथेरानमध्ये आतापर्यत २०४३.३/इतका पाऊस झाला असून आज दिवसभरामध्ये २६८.४ मिमि इतक्या पावसाची नोंद झाली आहे काल पासून येथे जोरदार पाऊस सुरू असला तरी त्याचा कोणताही परिणाम येथील पर्यटनावर झालेला नसून पावसाच्या जोरदार सरींचा पुरेपूर आनंद पर्यटक घेताना दिसून येत आहेत.

# पर्यटन वाढीसोबत पर्यटकांना सेवासुविधा देण्यासाठी सर्वपक्षीयांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा : स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील राजकीय परिस्थिती म्हणजे एकप्रकारचा बालिशपणाच म्हणावा लागेल अशी एकंदरीत अवस्था इथे पहावयास मिळते. प्रत्येक बाबतीत बाळहट्टा प्रमाणे राजकीय मंडळी वावरताना दिसतात. एकाच विषयावर आणि एकाच मुद्द्यावर शासन दरबारी मागणी करून याचे श्रेय आपल्या पारड्यात कसे पाडून घेता येईल याकडे कटाक्ष असतो. माथेरान हे खूप छोटेसे गाव असून हिल स्टेशन असल्यामुळे इथे नगरपरिषदेची १९०५ साली स्थापना करण्यात आली होती. त्यामुळेच इथे लोकनियुक्त प्रतिनिधी आपापल्या परीने विकास कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. सत्ता कोणत्याही पक्षाची असली तरी सुद्धा आपल्या माध्यमातून प्रलंबित कामे व्हायला हवी यासाठी नेहमीच इथे स्पर्धा पहावयास मिळते. नव्हे तर अनेकदा श्रेय लाटण्यासाठी सर्व पक्षांचा खटाटोप सुरू असतो. प्रत्येक पक्षाने प्रयत्न करणे आवश्यक आहे यात शंका नाही परंतु ज्या महत्वपूर्ण कामासाठी पुढे यायला हवे त्यासाठी सहसा कुणी धजावत नाही. एखादी व्यक्ती गावाच्या हितासाठी काही सकारात्मक विचार करत असल्यास नाहक खोडा घालण्यासाठी नेहमीच आकस वृत्तीमुळे होणारी कामे सुध्दा वेळप्रसंगी प्रलंबित रहात आहेत. इथे खूप काही करण्यासारखी कामे असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते आणि राजकीय हेवेदाव्यांमुळे हे गाव विकासापासून वंचित राहिले आहे. इथे



प्रत्येक राजकीय आणि अन्य क्षेत्रात चढाओढ आणि जलस वृत्ती ओतप्रोत भरलेली आहे. लोकप्रतिनिधी आणि स्थानिक नागरिक सुध्दा एकसंध नाहीत त्यामुळे याचा लाभ परिसरातील लोक घेताना दिसतात. ज्यांचा या गावाशी काडीमात्र संबंध नाही की या गावाशी काहीही सोयरसुतक नाही अशा इथे पोट भरण्यासाठी आलेल्या लोकांचे चांगुलचालन केले जात आहे. परिणामी बाहेरून इथे व्यवसायासाठी आलेली मंडळी राजकारणात सुध्दा सक्रिय केली जात आहेत.

मुख्य भेडसावत असलेली वाहतूक व्यवस्था ही आजतागायत खूपच खर्चीक अन सर्वसामान्य लोकांना न परवडणारी आहे.ऐन सुट्टयांच्या हंगामात नेहमीच वीज,पाणी समस्या निर्माण होत असते इथे अनेक महिला वर्ग विविध क्षेत्रात अथवा संघटनेचे नेतृत्व करण्यासाठी पदांवर कार्यरत आहेत या रणरागिनींकडून सुध्दा अनेक गोष्टी पूर्ण होऊ शकतात परंतु एकदा का फक्त नावावर पद आले की त्यासुद्धा गावाच्या अडचणी विसरून आपले पद टिकविण्यासाठी लक्ष केंद्रित करतात. नेरळ माथेरान या एकमेव घाटरस्त्यावर येणाऱ्या पर्यटकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. जीवनावश्यक वस्तूंच्या किमती ईथे गगनाला भिडल्या आहेत त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. घरगुती गॅसच्या दरात केवळ वाहतुकीच्याच कारणास्तव भरमसाठ वाढ झालेली आहे.

लॉक डाऊनच्या कठीण काळात स्थानिक युवकांना कुटुंबाचा रहाटगाडा चालविण्यासाठी अतिकष्टदायक हातगाडी ओढण्याची कामे करावी लागत आहेत तर पिढ्यानपिढ्या इथे हातरीक्षा ओढून सुध्दा काही स्थानिक आपले जीवन जगत आहेत दहावी नंतर पुढील शिक्षणासाठी काहींची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे त्यांना इथे अन्य काही औद्योगिक क्षेत्र नसल्याने नाईलाजाने घोड्याच्या व्यवसायात अथवा मोलमजुरी मध्ये गुंतावे लागत आहे. त्यामुळेच इथली एकएक पिढी व्यसनाधीन होऊन अर्ध्या आयुष्यात इहलोकीची वारी करत आहेत.

इथला भूमिपुत्र कशाप्रकारे सक्षम होईल, सर्वसामान्य लोकांना उपजीविकेचे साधन आणि पर्यटन विकास होईल जेणेकरून कुणालाही परावलंबी राहता येणार नाही त्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. यासाठी लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थानचे पदाधिकारी, मंडळाचे सदस्य, सर्वच राजकीय पक्ष यांनी एकत्रित येऊन राजकारण विरहित केवळ गावाच्या आणि इथल्या स्थानिकाच्या हिताच्या दृष्टिकोनातून सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास नक्कीच हे दुर्गम भागातील पर्यटनस्थळ नावारूपाला येईल यात शंकाच नाही.

घोड्यावरून आणि हातगाडीच्या साहाय्याने मानवी श्रमाद्वारे मालाची वाहतूक केली जाते ही खूपच महागडी सेवा आहे त्यासाठी जीवनावश्यक वस्तू आणि इमारतीसाठी लागणारे सामान यांची वहातुक गावातील अंतर्गत भागापर्यंत आणण्यासाठी टेंपोला परवानगी मिळण्यासाठी वरिष्ठ पातळीवर इथली एकंदरीत भौगोलिक परिस्थिती कथन केल्यास शक्य होऊ शकते. राजकीय पक्षांनी केवळ राजकारणात मशगुल न रहाता पर्यटन वाढीसोबत पर्यटकांना सेवासुविधा देण्यासाठी सर्वपक्षीयांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा अशी स्थानिकांकडून मागणी होत आहे.

## आयडीबीआय बँकेला घातला ३३ लाख २९ हजारांचा गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील आयडीबीआय बँकेला अज्ञात सायबर गुन्हेगारांनी तब्बल ३३ लाख २९ हजार रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकिस आले आहे. फसवणुकिचा हा प्रकार उघडकिस आल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी बँकेने दिलेल्या तक्रारीवरुन सायबर ग्रहेगारांच्या टोळी विरोधात फसवणुकिसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. तसेच या टोळीचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार शिल्पी अगरवाल या पनवेल मधील आयडीबीआय बँकेत  मॅनेजर म्हणून कार्यरत असून गत १२ जुलै रोजी त्या बँकेत असताना, एका सायबर गुन्हेगाराने बँकेतील खातेदार इकबाल काझी असल्याचे भासवून त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधला होता. तेसच त्याचे चेकबुक संपल्याचे व वैद्यकिय कारणासाठी त्याला तत्काळ काही रक्कम ट्रान्सफर करायचे असल्याबाबत सांगितले. तसेच त्याचे बँकेतील मॅनेजर टिना बासु यांच्यासोबत बोलणे झाल्याचे व १ करोड रुपयांची एफडी करण्यासाठी तो सायंकाळी बँकेत येणार असल्याचे सांगून त्याने शिल्पी अगरवाल यांचा विश्वास संपादन केला. यावर शिल्पी अगरवाल यांनी त्याला त्यांच्या लेटरडेवर रिक्वेस्ट लेटर पाठवुन देण्यास सांगितले.


त्यानुसार सायबर गुन्हेगाराने इकबाल काझी यांच्या कंपनीच्या नावाच्या लेटरहेडवर डायरेक्टरच्या सहीचे पत्र बँकेच्या ईमेल आयडीवर पाठवुन दिले. सदर पत्रामध्ये अमर चौहान, सुमित, अतुलकुमार व शहारुख खान या चौघांच्या बँक खात्याची माहिती व त्यांच्या बँक खात्यात पैसे पाठवुन देण्याबाबत सांगण्यात आले असल्यामुळे बँकेच्या मॅनेजर शिल्पी अगरवाल यांनी सदर पत्र कंपनीकडून आल्याचे समजुन त्यात दिलेल्या माहितीनुसार चार व्यक्तींच्या खात्यामध्ये  आरटीजीएसद्वारे  तब्बल ३३ लाख २९ हजाराची रक्कम पाठवुन दिली. त्यानंतर सारबर गुन्हेगाराने मागणी केल्यानुसार शिल्पी अगरवाल यांनी सदर व्यवहाराच्या युटीआय नंबर त्याच्या व्हॉट्सऍप व ईमेलवर पाठवुन दिले.

दरम्यान, इकरा स्टील टयुब्स प्रा.लि या कपंनीच्या बँक खात्यातून ३३ लाख २९ हजाराची रक्कम परस्पर वळती झाल्याची माहिती कंपनीचे डायरेक्टर इकबाल काझी यांना मेसेजद्वारे मिळाल्यानंतर त्यांनी तत्काळ बँकेत संपर्क साधुन सदरचे व्यवहार त्यांनी केले नसल्याचे व सदर व्यवहार थांबविण्यास सांगितले. त्यानंतर सायबर गुन्हेगारांनी इकरा स्टील टयुब्स प्रा.लि. या कंपनीच्या डायरेक्टरच्या सहीचा व लेटरहेडचा वापर करुन फसवणुक केल्याचे शिल्पी अगरवाल यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे गाठुन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सायबर गुन्हेगांराच्या टोळीवर फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

## तळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मधुकर शिवराम जाधव काळाच्या पडद्याआड

**दै.रायगड नगरी । तळा**

गरीबांचा आधारवड तळा ग्रामपंचायतीचे माजी अभ्यासू सरपंच मधुकर शिवराम जाधव यांचे काल अल्पशा आजाराने मुंबई येथे निधन झाले मृत्यु समयी ८५वर्षाचे होते. पश्चात पत्नी, दोन मुलगे, दोन मुली, जावई नातवंडे असा परिवार आहे. तळा शहरातील मुंढ्याची वाडीचे सुपूत्र होते. अन्याय सहन करीत नसत. राजकीय क्षेत्रा–पुर्वी एस् टी मध्ये



कंन्डक्टर म्हणून काही वर्षे काम केले. तिथे अन्याय सहन न झाल्याने शेती केली. आणी सर्व सामान्य गरीब जनतेची सेवा करण्याचे व्रत घेतलेन्याय मिळवून देणारे सर्व सामान्यांच्या हक्कासाठी अहोरात्र धावणारे सामान्यातलाअसामान्य माणूस म्हणून परिचित होते. साधी रहाणी मनमिळावू स्वभाव होता. सफेद लेंगा, शर्ट, सदरा, टोपी असा पेहराव होता. असा निर्गवी माजी सरपंच निधन झाल्याने सर्व स्तरातून शोक व्यक्त केला जात आहे. त्यांच्या निधनाने पोकळी निर्माण झाली आहे.

## कोरोना संकटातही पावसाळी पर्यटनाला उधाण; विकेंडला धबधबे, धरणे आणि फार्महाऊसवर गर्दी

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

कोविडच्या पार्श्वभूमीवर नियमांची बंधने झुगारून जिल्ह्यात पावसाळी पर्यटनाला उधाण आले आहे. जिल्ह्यातील विविध ठिकाणचे धबधबे, धरणे, डोंगरावरून वाहणाऱ्या जलधारा आणि फार्महाऊसवर पर्यटकांची गर्दी दिसत आहे. विकेंडला पुणे, मुंबई, ठाणे आदी शहरातील नागरिकांची येथे प्रचंड गर्दी लोटते. हे सर्व आवरणे पोलिसांना देखील डोकेदुखी ठरत आहे.

कोरोना काळात देखील येथील अनेक ठिकाणे पर्यटकांनी गजबजलेली दिसतात. काही दंगेखोर व अतिउत्साही पर्यटकांमुळे पर्यटनाला गालबोट देखील लागते. काही दिवसांपूर्वी पाली–भूतवली धरणात बुडून ३ मुलांचा मृत्यू झाला आहे. अनेक ठिकाणी पर्यटक गर्दी करून मौजमजा करतात. यामुळे कोरोनाचा प्रसार वाढण्याची शक्यता आहे. याबरोबरच जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात विविध ठिकाणी फार्महाऊस आहेत. या फार्महाऊसवर विकेंडला पार्ट्या रंगत आहे. बसेस भरून फार्महाऊसवर लोक येत आहेत व मौजमजा करतात. शिवाय विकेंडला येथील रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी पहायला मिळते. या वाहनांना हाताळतांना पोलिसांना डोकेदुखी होत आहे.

जिल्ह्यातील पांडवकडा, झेनिथ, आषाने, जुम्मापट्टी, बेडिसगाव, आडोशी, बोरगाव, परसदरी आदी धबधब्यांवर, तसेच पाली भुतिवली, कोंडाणे, पळसदरी आदी धरणांवर पर्यटकांना जाण्यास मागील २–३ वर्षांपासून बंदी आहे. तसेच माणगाव तालुक्यातील देवकुंड येथेही पर्यटकांना बंदी आहे. यातील बहुतांश ठिकाणी कलम १४४ देखिल लावण्यात आले आहे. तरीदेखील तिथे पर्यटक जात आहेत. याबरोबरच नेहमीच्या ठिकाणांपेक्षा काही वेगळ्या ठिकाणी पर्यटक जात आहेत. मग ताम्हाणी घाट, वरंध घाट, तसेच खोपोली, कर्जत, सुधागड, फणसाड व कर्नाळा अभयारण्य, मुरुड, श्रीवर्धन व अलिबागमध्येही पर्यटक फिरत असतात. प्रत्येक तालुक्यातील धबधबे, ओढे व धरणे येथे पावसाळी पर्यटनासाठी पर्यटक तोबा गर्दी करत आहेत.



## दिक्षा बोरकर ९५.४०% गुण मिळवून प्रथम

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

मार्च २०२१ या शैक्षणिक वर्ष इयत्ता दहावी च्या परीक्षेत न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा ची विद्यार्थिनी कुमारी दिक्षा नितीन बोरकर हिने ९५.४०%गुण मिळऊन प्रथम येण्याचा मान पटकावला. तर नेहा हुमाउन खान ९२.२०% गुण मिळऊन दुसरी, आंजार्लेकर प्रणय दिगम्बर ९१.४०% गुण तिसरा,८९.४०% मयुरी सदाशिव पेंढारी चौथी आणि आर्य महेंद्र करडे ८९.२०% गुण मिळऊन पाचव्या क्रमांकाने यशस्वी झाले. मागासवर्गीयांतून प्रथम ख़ुशी अनिल जाधव (७८.४०%), द्वितीय स्नेहा राजू पवार (७७.२०%), तृतीय क्रमांक श्रेयस संतोष चौगुले (७६.४०%) गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.अविनाश जनार्दन केणी, रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड  यांची पत्नी कै.सुरेखा अविनाश केणी यांचे मालकीची व नावे असलेली खालील वर्णनाची कार आहे.

**कंपनीचे नाव** : **मारुती**
**मॉडेल** : **स्विफ्ट न्यु** Lxi
**रजिस्ट्रेशन नंबर** : MH 46 BA 3374
**मॅन्युफॅक्चर वर्ष** : 2017
**इंजिन चेसीस नं** : 1971580-MA3EHKD1S00C80627

वरील कारच्या मुळ मालक कै.सुरेखा अविनाश केणी ह्या मयत झालेल्या आहेत. सबब सदर कार आमचे अशिल तसेच कै.सुरेखा अविनाश केणी यांचे पती श्री.अविनाश जनार्दन केणी यांचे नावे कायदेशीर मार्गाने हस्तांतरीत करावयाची आहे. सबब सदर कार बाबत इतर कुणाचाही व्यक्तीचा अथवा इसमाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, खरेदीखत, ताबा, दान, गहाण, बोजा, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीज साठेकरार, एम.ओ.यु. किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात अथवा समक्ष येवून भेटावे. मुदतीत न आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व सदरची मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदरचा हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०७/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/–**
**ॲड.उदय प्र. मोकल**
**अे/६३, रुम नं.१०, जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी जि.रायगड ४००७०७, नोड–उरण**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : आडिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिल १) श्री.गोबिंद सिंग निर्मल सिंग सैनी, २) सौ. रंजित कौर गोबिंद सिंह सैनी, रा.रुम नं.आर/२/एच/५०२, मॅग्नोलिया एन्क्लेव्ह, नाहर, अमृत शक्ती, चांदिवली स्टुडिओ जवळ, साकीनाका, मुंबई–७२, ३) श्री.हिरा सिंग बचन सिंग पाबळे रा.वर्सोवा म्हाडा, फ्लॅट नं.१६०, हरनिवास जानकी देवी स्कूल रोड, अंधेरी (प.), मुंबई–४०००५३ यांनी खालील जमीन मालकाकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आडिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रं. /उपविभाग | भुधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| ५/५/१/क | भो वर्ग २ | ०–३२–०० पो.ख.०–२२–०० एकूण ०–५४–०० | ०.६५ | भरत कृष्णा भोईर यांचे हिश्यातील ०–२७–०० पैकी खरेदी क्षेत्र ०–२२–० |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी सामंजस्य करार, विक्रीचा करार, मक्ता, रस्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान, बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार वकील यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहा–चवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने वा कुरियरने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/०७/२०२१

**सही/–**
**ॲड.नरेश गणपत ठाकूर**
**साईप्रसाद निवास कोपरा खारघर, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१०**
**मो.नं.९३२४०८०२५४**

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल जाहीर नोटीस

दिवाणी अ १५० म
ॲड.सुयोग मोलाने
ॲड.निजामुद्दीन शेख

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.श्री.भाकरे, सह दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.४१७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०९/२१

सौ.संतोष शर्मा व योगेश दिनदयाल शर्मा
विरुद्ध
कोणीही नाही

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार क्र.१ संतोष शर्मा हे मयत दिनदयाल शर्मा यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ हा मयत दिनदयाल शर्मा यांचा मुलगा आहे. मयत दिनदयाल शर्मा यांचे रा.राजस्थान येथे दिनांक ११/१२/२० रोजी निधन झाले असून ते रा.कळंबोली, पनवेल येथील रहिवासी होते. कायद्यातील तरतुदीनुसार मयत दिनदयाल शर्मा यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.

मयत दिनदयाल शर्मा हे हयात असताना त्यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**१) फ्लॅट क्र.४०५, मेहता को.ऑ.हौ.सो.प्लॉट क्र.२३, से.८, कळंबोली, पनवेल**
**२) फ्लॅट क्र.४०८, मेहता को.ऑ.हौ.सो.प्लॉट क्र.२३, से.८ कळंबोली, पनवेल**
**३) ऑफिस क्र.बी–२०४६, बिमा कॉम्प्लेक्स कळंबोली, ता.पनवेल**
**४) वाहन क्र.**MH-06-AS-4209 (Panvel Rto)
**५) वाहन क्र.**MH-46-Z-4737 (Panvel Rto)

ही मिळकत ह्या अर्जाचा विषय आहे.

वर वर्णन केलेली मिळकत मयत दिनदयाल शर्मा यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांचे नावे व्हावे याकरिता आवश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदर मिळकतीबाबत मयत दिनदयाल शर्मा यांच्या कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरच्या वारस दाखल्याचे कामी कोणत्याही व कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सदर न्यायालयात हजर राहून कायदेशीररित्या हरकती नोंद कराव्यात. सदर नोटीशीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभांस वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आज तारीख १९/०७/२०२१ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## रस्त्यावर खड्डे, बुजविण्याची मागणी




**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीत महानगर गॅस कंपनीचे रोड खोदुन लाईन टाकल्या व रोडचे खड्डे जसेच्या तसेच ठेवले आहेत. ते बुजविण्याची मागणी जय हरी महिला मंडळ कामोठे, आणि कामोठे रहिवासी सामाजिक संस्था यानी केली आहे.

कामोठे सेक्टर ८, एम एन आर शाळा सेक्टर ६ व ८ मधील रोड शंकर मंदीर चौक, सेक्टर ५ व ९ मधील रोड दत्तुशेठ पाटील विदयालय ते रामशेठ ठाकुर विदयालय हया ठिकाणी महानगर गॅस कंपनीने रस्ते खोदुन लाईन टाकल्या व रस्त्यावरचे खड्डे जसेच्या तसेच ठेवले आहेत. तसेच रोडचे पथदिवे सुध्दा भरपुर दिवसापासुन बंद आहेत याकडे कोणीही लक्ष देत नाही. या सर्व रस्त्यामधुन शाळेचे विध्यार्थी, रहिवाशी यांची रहदारी चालु असते. वाहने चालु असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. येथील काम करण्याची लवकरात लवकर व्यवस्था करावी. अन्यथा आंदोलन करावे लागेल. अशा इशारा देण्यात आला आहे. याची लवकरात लवकर व्यवस्था करावी. अशी मागणी जय हरी महिला मंडल कामोठे यानी सिडकोचे कार्यकारी अभियंता याना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन तर्फे पुरग्रस्त भागात आरोग्य शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी मुळे पूरस्थिती निर्माण झाली, कोरोना महामारीचे संकट त्यातच अचानक उद्भवलेल्या पुरामुळे त्या परिसरातील नागरिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. त्यामुळे मुरुड तालुक्यातील खारदोडकुले, आदाड, या पुरग्रस्थ भागात अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन तर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आपत्कालीन परिस्थितीत शासनाकडून नुकसान भरपाई मिळेल, अन्नधान्य मिळेल परंतु त्यांना मानसिक आधार देणे तसेच या परिस्थितीत आजारी लोकांना मदतीचा हात देऊन बरे करणे गरजेचे आहे म्हणून आम्ही या शिबिराचे आयोजन केले असल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष मयूर कल्याणी यांनी सांगितले, या शिबिरात आरोग्य तपासणी करून त्यावर उपचारही करण्यात येणार आहेत. त्यासाठी लागणारी औषधे अलिबाग मधील वायशेत येथील माणुसकी प्रतिष्ठान हया सामाजिक संस्थेने पुरवली आहेत. सदर शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून तेथील नागरिकांनी अलिबाग मुरुड मेडिकल असोसिएशन च्या टीमचे विशेष आभार मानले.

# उरणच्या युईएस शिक्षण संस्थेच्या मनमानी कारभाराविरोधात पालक- शिक्षक संघटनेची उरण पोलिसात धाव

**दै.रायगड नगरी । उरण**

शासकीय नियमांची पायमल्ली, नियमबाह्य फी वाढ, चाईल्ड राईट क्टचा भंग, फी अभावी विद्यार्थ्यांचे निकाल रोखून ठेवणे आदी विविध मुद्यांवर येथील युईएस इंग्रजी माध्यमाच्या शाळा व्यवस्थापनावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी पालक शिक्षक संघाने उरण पोलिसांकडे तक्रारी अर्जाद्वारे केली आहे.

उरण येथील उरण एज्युकेशन संस्थेच्या (युईएस) इंग्रजी माध्यमाच्या शाळेत १ ते १२ पर्यत तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये गरिब-गरजू सफाई कामगार, रिक्षावाल्यापासुन मोठ्या श्रीमंतांपर्यतची मुले शिक्षण घेत आहेत. या संस्थेने चालविलेल्या मनमानी कारभारामुळे येथील विद्यार्थी पालक त्रस्त झाले आहेत. शासनाचे सर्वच नियमांना बगल देऊन नियमबाह्य ४० टक्के भरमसाठ फी वाढ केली आहे. फी न भरलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे निकाल रोखुन ठेवण्यात आलेले आहेत. राज्यात कोरोना संकटाने मार्च २०२० पासून हाहा:कार माजवल्यामुळे राज्यातील सारी व्यवस्था कोलमडून पडली आहे. अशा विवंचनेत असलेल्या राज्यातील जनतेला विविध स्तरांवर सवलती आणि विविध योजना शासनाने जाहीर केल्या आहेत.

मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था ऑनलाईन पध्दतीने सुरू झाल्यानंतर जवळपास सगळ्याच शाळांमधील तात्पुरत्या भरलेल्या शिक्षकांना घरी बसवण्यात आले आहे. यामुळे या शिक्षकांना द्यायचे वेतन हे शाळांकडे जमा होऊ लागले. प्रत्यक्ष शाळा सुरू नसल्याने शाळांना लागणारी वीज, पाणी व तत्सम खर्च यात प्रचंड बचत झाली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष शाळा सुरू नसल्याने शाळांना लागणारी वीज, पाणी व तत्सम खर्च यात प्रचंड बचत झाली आहे.

त्यामुळे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांकडून शिक्षणाव्यक्तीरिक्त कोणतीही फी आकारू नये, असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मात्र युईएस इंग्रजी शाळा व्यवस्थापनाने शासनाचे आदेश धाब्यावर बसवले आहेत. चाईल्ड राईट क्टचाही भंग केला आहे.या विरोधात मागील काही महिन्यांपासून युईएस विरोधात विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पालक शिक्षक संघाचा जोरदार संघर्ष सुरू आहे.मात्र मुदत देऊनही संघाच्या मागण्यांकडे शाळा व्यवस्थापनाने दुर्लक्षच केले असल्याचा आरोप पालक शिक्षक संघाने केला आहे.

त्यामुळे शासकीय नियमांचे पायमल्ली करून पालक, विद्यार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या युईएसच्या शाळा व्यवस्थापनाविरोधात उरण पोलिस ठाण्यात काल १९ जुलै २०२१ रोजी पालक शिक्षक संघाने तक्रारी अर्ज दाखल केला आहे. या तक्रारी अर्जाद्वारे शाळा व्यवस्थापनाविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी अध्यक्ष प्रवीण पुरो, दत्तात्रेय शेळके, बिकेन अजमेरा, उपाध्यक्ष निलेश कदम, सेक्रेटरी हेमा घरत, भारती कडू, पुनम पाटेकर, ॲड.संपदा मोकल आणि पालक उपस्थित होते.

# माथेरानमध्ये पर्यटनाला या पण मास्क घालूनच!

**दै.रायगड नगरी । माथेरान**



लॉकडाऊन काळात घरात बसून कंटाळून गेल्यामुळे सर्व पर्यटनस्थळे केव्हा एकदा खुली केली जात आहेत याची पर्यटक वाट आतुरतेने पहात होते. सर्वांचे आवडते पर्यटनस्थळ म्हणून माथेरान हे एकमेव स्वस्त दरात एकदिवसीय ठिकाण सर्वांनाच परिचित आहे. त्यामुळे माथेरान अनलॉक केल्यामुळे अनेकांनी या स्थळाला अधिकाधिक पसंती दिली आहे.

कोरोनाचा सामना तर करावयाचा आहेच परंतु शासनाने दिलेल्या नियम व अटींचे देखील तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. सोशल डिस्टन्स त्याचप्रमाणे सॅनिटायझरचा वापर आणि खासकरून गर्दीच्या ठिकाणी मास्क लावणे हे बंधनकारक आहे. वेळोवेळी सूचना करून सुध्दा अनेकजण मास्कचा वापर करताना आढळून येत नाहीत. राज्यातील ठराविक पर्यटनस्थळे खुली केलेली आहेत त्यात माथेरान मधील नागरिकांचे संपूर्ण जीवनमान हे पर्यटनावर अवलंबून आहे. लॉकडाऊनच्या कठीण समयी इथल्या स्थानिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते. एक विशेष बाब म्हणून हे पर्यटन सुरू केल्यामुळे आज इथला भूमिपुत्र सुखाने दोन घास आपल्या कुटुंबासह खात आहे. माथेरानमध्ये कोरोना रुग्णांची संख्या नगण्य आहे तरीसुद्धा येणाऱ्या पर्यटकांमधून एखादेवेळी कोरोनाची बाधा उद्भवू शकते. त्यामुळे पर्यटकांनी सुध्दा खासकरून काळजी घेत शासनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. ऐन गर्दीच्या वेळी विना मास्क अनेकजण फिरत असतात अशांवर कारवाई करण्यात येत असून नगरपरिषदेच्या आणि पोलीस ठाण्याच्या माध्यमातून विना मास्क फिरणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई केली जात असून पाचशे रुपये दंडाची रक्कम वसूल केली जात आहे. त्यामुळे माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांनी मास्कचा वापर करून इथे प्रवेश करावा अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.


## पावसाचा तडाखा ; आदिवासी कुटुंबाचे घर पडले

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**



उरण येथील सारडे ग्रामपंचायत हद्दीतील बेलवाडी कातकरी वाडी येथील रहिवासी चंदा नारायण वाघमारे या कुटुंबाचे राहते घर पावसाच्या तडाख्यात पडले आहे. त्यामुळे वाघमारे कुटुंबावर बेघर होण्याची वेळ आली आहे. सुदैवाने घरातील दोघेही मच्छी पकडायला गेले असल्याने, कोणतीही जीवित हानी झाली नाही. तरी चंद्रा वाघमारे यांच्या कुटुंबीयांना घर बांधून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी गरीबांचे कैवारी तथा कामगार नेते भुषण पाटील, समाजसेवक प्रा.राजेंद्र मढवी यांनी केले आहे.

# मुरुड तालुक्यातील राजपुरी येथे दरड कोसळली ; दोन, तीन घरांचे प्रचंड नुकसान



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील एक बाजूला समुद्र दुसऱ्या बाजूला डोंगर वस्ती असलेल्या राजपुरी गावी शनिवार पासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून धनंजय आंबटकर, राजेश आंबटकर, परशुराम आंबटकर, रामचंद्र भगत, दत्तात्रेय चव्हाण, सुरेश चव्हाण यांच्या घरासमोरील संरक्षक भिंत खाली डोंगर उतारावर असलेल्या घरांवर कोसळली.

त्यामध्ये लक्ष्मण मोंनाक, विठ्ठल सुर्ती यांच्या घरांचे प्रचंड नुकसान झाले आहे. घरांच्या भिंती कोसळल्या तसेच सीताराम गिदी यांच्या घरामध्ये वरील भिंतींची माती दरवाजा तोडून आतमध्ये शिरली असून संपूर्ण घर मातीने भरले आहे त्या घराचेही प्रचंड नुकसान झाले आहे. सुदैवानं जीवित हानी झाली नाही, दरडग्रस्त भागातील आठ कुटुंबातील ३५ जणांना मुरुड तहसीलदार व स्थानिक प्रशासनाने सुरक्षित स्थळी हलविले आहे. घटनास्थळी तहसीलदार गमन गावित , मंडल अधिकारी, तलाठी यांनी पाहणी करून सरपंच, व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत घटनेचे पंचनामे केले आहेत. तसेच भारतीय हवामान विभागाच्या सूचनेनुसार रायगड जिल्ह्यात सोमवारी अतिवृष्टी होण्याची शक्यता वर्तवीली आहे. सखल भागातील नागरीकांनी विशेषतः नदी, खाडी, समुद्र किनाऱ्यावरील गावांमधील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच दरड प्रवण भागातील नागरिकांनी दक्षता घ्यावी असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# संततधार पावसामुळे खोपोली, खालापूरात पाणी तुंबले



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मागील दोन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत असल्याने सर्वत्र ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले असून पातळगंगा नदी सह अन्य गावाजवळून वाहणाऱ्या जोडनद्याची पातळी वाढल्याने प्रवासासाठी असणारे पुल पाण्याखाली गेल्याने अनेक गावांचा मार्गच बंद झाल्याने जागोजागी मदतीसाठी सामीजक कार्यकर्ते सरसावले आहेत तर खोपोली शहरासह खालापूर तालुक्यात सकळ भागात पाणी साठल्याने नागरिकांनी घराबाहेर पडू नये असे अहवान प्रशासनाने केले आहे.

शनिवार पासून हवामान खात्याने वर्तविल्या नुसार शनिवार पासून सत्त-धार पावसाने सुरुवात केल्याने सर्वत्र ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र आहे तर काही विश्रांती नंतर पुन्हा जोरदार पावसाच्या सरी कोसळत असल्याने खोपोली शहरात भाऊ कुंभार चाल, कृष्णा नगर, लौजी, उद्यविहार, शिळफाटा, डीसी नगर सह अन्य भागात पाणी साठल्याने वाहतुकीचे मार्ग थांबले होते. मात्र पावसाच्या उघड झापे मुळे डीसी नगर सह अन्य भागातील पाण्याचा निचरा होत असल्याने लौजी उदय विहार वगळता खोपोली शहरात परिस्थिती नियंत्रणात होती. खोपोलीच्या नगराध्यक्षा सुमन औसरमल स्थानिक नगरसेवक व खोपोली पालिकेचे अधिकारी व कर्मचारी या परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याने काही भागात जे सी बी च्या साह्याने पाण्या वाटा तयार करून पाण्याचा निचरा होण्यासाठी प्रयत्न करीत होते तर खालापुरातील पातळगंगा नदी सह बालगंगा नदी दुथडी भरून वाहत होते. तर जोडनद्यांचे पूल पाण्याखाली गेले होते.

वावोशी भागात जांभिवली येथील बालगंगा नदीचे येणाऱ्या पाण्यामुळे पूल पाण्याखाली गेले तर निगडोली पूल यासह काढरोली येथील पूल पाण्याखाली गेले होते. त्यामुळे येथील मार्गच बंद झाले होते त्यामुळे रविवार सोमवारी पूर्णता जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र आहे.

# सुधागड किल्ल्यावरील मायेची सावली हरपली

## ३५ वर्षांपासून गडाची सेवा करणाऱ्या राई शिद आजींचे निधन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



सुधागड किल्ल्यावर तब्बल ३५ वर्षांपासून एका झोपडीत राहून गडाची सेवा करणाऱ्या व गडावर येणाऱ्या प्रत्येकाला मायेने खाऊपिऊ घालणाऱ्या गडाची इतंभूत माहिती सांगणाऱ्या राई मोरू शिद आज्जींचे शनिवारी (ता.१७) निधन झाले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील अनेक दुर्गप्रेमींनी हळहळ व्यक्त करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. सोशल मीडियावर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या निधनानंतर शोक व्यक्त करून आदरांजली वाहिली.

रात्री अपरात्री कधीही गडावर गेले तरी झोपडीतून या माऊलीचा आवाज यायाचा,'च्या' ठेवते या..! राई आज्जीने गेली ऊन वारा पावसाची तमा न बाळगता ३०-३५ वर्ष गडावर येणाऱ्या प्रत्येक भटक्यांची सेवा केली. झोपडीत असेल नसेल, वा काहीही असेल तर ताटात समोर यायचं, तिने तिचं आयुष्य गडावर घालवलं, सुधागडाचा आधार आज हरपला. असे उद्गार बा रायगड परिवाराने काढले. जिल्हा परिषद सदस्य सुरेश खैरे यांनी देखील दुःख व्यक्त करून राई आज्जीला श्रद्धांजली वाहिली.

गडावर होणाऱ्या प्रत्येक श्रमदानाची ती साक्षीदार आहे. गडावरच शिवमंदिर उभारण्यापासून ते गडावर लाकडी महाद्वार पर्यँत सगळी कामे ती कसोशीने पाहायची. तरुणांना लाजवेल अश्या वेगाने ती गड चढ-उतार करायची. गडावर राई आज्जीच्या गाई होत्या पण तिला स्वतःला कधी हिंस्त्र प्राण्यांची भीती वाटली नाही. विशेष म्हणजे राई आज्जीचे सगळं कुटूंब खाली गावात आहे. पण तिला गडावरच राहण्याची खूप आवड असल्याने ती एकटी गडावर राहत असे. येणाऱ्या वाटसरूला थरथरत्या हाताने गरम भाकरी करून घालायची. आणि मुक्या जीवांना लळा लावायची. कसलीही अपेक्षा न ठेवता गुरेढोरे सांभाळत व असंख्य भटक्यांची भूक भागवत तिने आपलं आयुष्य गडावर घालवलं. सुधागडाचा चिरा-न चिरा तिच्या स्पर्शाचा तिच्या मायेचा सा-क्षीदार आहे. आशा आठवणी बा रायगड परिवाराने जागवल्या. व राई आज्जीना श्रद्धांजली वाहिली. निहारीका शिर्के यांनी सांगितले की आज्जीने केलेली ठसकेदार लाल मिरचीच्या ठेच्याची चव अजूनही जिभेवर तराळते. गडावरील भोराई मातेची देखील आज्जी मनोभावे सेवा करायच्या असे देखील शिर्के म्हणाल्या.

# पाली अंबा नदी पुलावरून गेले पाणी ; वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील वाहतूक ठप्प



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातून वाहणाऱ्या आंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे सोमवारी (ता.१९) सायंकाळी पाली अंबा नदी पुलावरून पाणी गेल्याने वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. परिणामी प्रवाशी व वाहनचालकांची मोठी गैरसोय झाली होती.

तालुका प्रशासनाने नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. नदी किनारी राहणाऱ्या नागरिकांनी आपली सुरक्षितता म्हणून मौल्यवान वस्तू व कागदपत्रे घेऊन सुरक्षित ठिकाणी जावे असे आवाहन देखील करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत व काही अडचण असल्यास नागरिकांनी मला किंवा आपत्कालीन कंट्रोल रुमला संपर्क करा असे आवाहन तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी केले आहे. तसेच तालुक्यातील सर्व सरपंचांना देखील दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मंगळवारी आषाढी एकादशीनिमित्त 'अवघे गर्जे पंढरपूर'

# पंडित उमेश चौधरी आणि पंडित प्रतापराज पाटील प्रथमच एकत्रितपणे करणार सादरीकरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आषाढी एकादशीनिमित्त मंगळवारी (दि. २० जुलै) 'अवघे गर्जे पंढरपूर' या धार्मिक कार्यक्रमाचा थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून भक्तगणांना लाभ घेता येणार आहे.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष पंडित उमेश चौधरी आणि तालमणी पंडित प्रतापराज पाटील प्रथमच हे दोन दिग्गज कलाकार एकत्रितपणे कार्यक्रम सादर करणार आहेत. या वर्षीही कोरोना महामारीमुळे वारी शासनाने रद्द केली आहे. तरी सर्व भक्तमंडळींना भजन, आरती व दर्शनाचा लाभ व्हावा म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मल्हार टिव्ही व इतर सोशल मीडियाच्या माध्यमातून २० जुलै रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

# पनवेल तालुक्यात खावटी अनुदान योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबाना अन्नधान्य वस्तूचे किट वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोना महामारीमुळे अनेकांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिलेले आहे. या परिस्थितीत डोंगर दऱ्याखोऱ्यात राहणारा आदिवासी समाज रोजगारांपासून वंचित राहिला आहे. त्यामुळे शासनाकडून या आदिवासी बांधवांसाठी खावटी अनुदान वाटप योजना विशेष योजना म्हणून मंजूर केली असून ही योजना आदिवासींसाठी लाभदायक ठरत आहे. आदिवासी आयुक्तालय नाशिक व सांगुर्ली ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने पनवेल तालुक्यातील तालुक्यातील चिंचवण येथील आदिवासी कुटुंबाना सहाय्य करणेसाठी खावटी अनुदान योजने अंतर्गत अन्नधान्य वस्तूच्या किटचे वाटप करण्यात आले.

चिंचवण येथील सरकारमान्य रास्त भाव धान्य दुकान येथे आदिवासी खावटी अनुदान योजनेंतर्गत अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. सरपंच पद्माकर कातकरी, उपसरपंच वसंत पाटील, गावचे पोलीस पाटील दिलीप खुटले, सामाजिक कार्यकर्ते केशव ठोंबरे, चंद्रकांत ठोंबरे, संजय पोपेटा, रुतिक ठोंबरे, सौ.आशाताई महाडिक यांच्या उपस्थितीत करण्यात आले.